# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रारीची तपासणी सूची
## क्र. रामाआ/तक्रार/५९७/२०२२/अहिल्यानगर

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.ॲड. केशव एस.राजेनिंबाळकर,<br>रा.२/२, निवारा बिल्डींग, सहयोग नगर, मु.पो.ता.जि.बीड. | सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जामखेड, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर. |

### सुनावणी दिनांक-२४/०६/२०२४

तक्रारदार यांनी दि.०५/१२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " द्वितीय अपिल निर्णयान्वये सदर प्रकरणी मला माहिती अथवा कोणताही पत्रव्यवहार सदर विभागाकडून झाला नाही. तरी मा.आयुक्त माहिती यांनी सदर विभागावर कोर्टाचा अवमान केलेबाबत रितसर कार्यवाही करुन मला माहिती मिळणेबाबत आदेशीत करावे." असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सुनावणीसाठी – तक्रारदार आणि तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

३. तक्रारदार यांनी मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

सन-२०१७ ते दि.२७/०९/२०२० या कालावधीतील आपल्या कार्यालयाचा वर्षनिहाय लेखापरिक्षण अहवाल(आक्षेप पुर्तता नोंदवहीसह) आक्षेप पुर्तता केल्याची वर्षनिहाय पुराव्यानिशी माहिती साक्षांकित छायांकित करुन मिळावी.

४. आयोगाने द्वितीय अपिल क्र.३६/२०२१/अहिल्यानगर संदर्भात दि.०६/०७/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जामखेड यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दि.२७/०९/२०२० रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थी यांच्याकडून माहिती शुल्काचा भरणा करुन नोंदणीकृत पोचदेय डाकेने पुरवावी.

५. सुनावणी दरम्यान उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी आयोगाच्या दि.०६/०७/२०२२ रोजीच्या आदेशान्वये माहिती शुल्क भरणा केलेला नसून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जामखेड, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर यांनी तक्रारदार यांना आयोगाच्या आदेशानुसार माहिती देण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नसल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्र.५९७/२०२२/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ९८८३ 10 MAR 2025